# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक
गडचिरोली दि. ०५/१२/२०१७

## <u>***नक्षल सप्ताह विरोधात कारवाफा येथे शांतता रॅली***</u>

- **नक्षल विरोधात जनसामान्य आदिवासींचा आक्रोश**

नक्षल्यांनी २ डिसेंबर ते ९ डिसेंबर दरम्यान पुकारलेल्या नक्षल बंदला विरोध करण्यासाठी जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन व पोलीस मदत केंद्राच्या वतीने शांतता रॅली आयोजित केली जात आहे. दिनांक ०२/१२/२०१७ ते ०४/१२/२०१७ पर्यंत मौजा कारवाफा येथे पोलीस विभागातर्फे 'जनमैत्री मेळाव्याचे' उपविभाग पेंढरी कॅम्प कारवाफा यांच्या तर्फे आयोजन करण्यात आले होते. सदर मेळाव्याचे उद्‌घाटन उपविभागीय पोलीस अधिकारी कारवाफा श्री. बसवराज शिवपुजे यांनी केले. ३ दिवस पार पडलेल्या या मेळाव्यात दिनांक ०२ डिसेंबर रोजी ग्रामिण रुग्णालय कारवाफा यांच्या तर्फे मेळाव्यास उपस्थित नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. गरजुंना औषध व गोळयांची वाटप करण्यात आले. व्यसनमुक्ती संबंधीत जनजागृती करून निर्व्यसणी लोकांचा सत्कार करण्यात आला. यानंतर सामुहिक जेवणाचा कार्यक्रम पार पाडून पथनाटय कार्यक्रम घेतले. दिनांक ०३ डिसेंबर रोजी विविध कायदयासंदर्भात माहिती देवून विविध खेळ व सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. दिनांक ०४ डिसेंबर रोजी सकाळी ग्रामस्वच्छता अभियान घेण्यात आले. सामान्य नागरिकांच्या नक्षलवादयांनी केलेल्या हत्येच्या विरोधात शांतता रॅली काढण्यात आली. त्यात नागरिकांनी केलेल्या संविधान जिंदाबाद व नक्षलवाद मुर्दाबाद अशा प्रकारच्या घोषणांनी परिसर दणानुन निघाला होता. त्याचबरोबर कुणीही नक्षलवादयांना सहकार्य करणार नाही, गावात नक्षलवादयांना थारा देणार नाही तसेच अन्न पाणी देणार नाही अशी रॅलीस उपस्थित लोकांनी शपथ घेतली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेची पुजा करून सर्वांना शेती उपयोगी लागणारे साहित्य व ब्लॅंकेट वाटप करण्यात आले तसेच उपस्थित नागरिकांना मिठाई वाटप करून श्री. बसवराज शिवपुजे यांनी उपस्थित नागरिकांच्या समस्या जाणून घेवून त्यांना योग्य ते मार्गदर्शन केले.

सदर जनमैत्री मेळाव्यास उपविभागातील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते. मेळाव्याचे सुत्रसंचालन पोउपनि शशिकांत लोंढे पोमके कारवाफा यांनी केले तर आभार प्रदर्शन पोउपनि विक्रांत चव्हान यांनी केले. तसेच मेळाव्यास पोउपनि खराडे, चौगुले व सर्व पोलीस कर्मचारी यांनी कार्यक्रम पार पाडण्यास सहकार्य केले.




